॥न्यू इंग्लंड मराठी मंडळ॥
सेतू मराठी मनांचा
New England Marathi Mandal

# आकाश कंदील

# DIWALI

नोव्हेंबर २०२४

दिवाळी अंक

॥न्यू इंग्लंड मराठी मंडळ॥
सेतू मराठी मनांचा
New England Marathi Mandal

अनुक्रमणिका


- NEMM अध्यक्षीय
- कार्यकारिणी समिती, संपादक समिती
- NEMM Sponsors
- बाल कला
    - माझा बाप्पा - अन्वित भोजने
    - Colorful Sky - मिश्का भालेराव
    - माझा Favorite बाप्पा - अवनी भिडे
    - पणतीचा प्रकाश - मिश्का भालेराव
    - दिवाळी - नीना नाखरे
- कविता, कोडी
    - तुझी तुळस आज ही दाराबाहेर ताटकळते आहे - अजिंक्य बोकिल
    - महाराष्ट्र शब्दकोडे - गुरुप्रसाद पांडुरकर
    - एकता - ज्योती जोशी
    - तळ्यात की मळ्यात - ज्योती जोशी
    - शोध - ज्योती जोशी
- मुलाखत/मनोगत
    - Sounds of Joy - नील नाखरे
    - NEMM Josh - मयुर मनसुख, शिवदीप येलिकर, निशिकांत पुरोहित, मिहीर पटवर्धन
    - चाकोरीबाहेर - राहुल जोशी
- लेख
    - दिवाळी माझा आवडता सण - नेहा खैरनार
    - आपलं बुवा असंच आहे - राजेश बेरी
    - विंडो सीट - चिंतामणी मुळे
    - गृहीत - भास्कर पवार
    - निष्कांचन - वीणा पेंडसे
    - कल दे सॅक - चिंतामणी मुळे

**अध्यक्षीय**

प्रिय न्यू इंग्लंड मराठी मंडळा चे सदस्य, मित्र, आणि कुटुंबीय,
सर्वप्रथम, तुम्हा सर्वांना आणि तुमच्या परिवाराला दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा! हा प्रकाशाचा सण तुमच्या जीवनात सुख, समृद्धी आणि आनंद घेऊन येवो, हीच आमची सदिच्छा.

बांधूया 'सेतू मराठी मनांचा' या खास ब्रिदवाक्याने आपण आपल्या या वर्षीच्या कार्याची सुरुवात केली. आपला मराठी वारसा अभिमानाने बाळगणे, सामुदायिक outreach वाढवणे, मराठी भाषेला चालना देणे, विविध आवडींसाठी एक नेटवर्क तयार करणे, आपल्या युवा पिढीला सशक्त करणे, संस्कृतीची जोपासना आणि परंपरांचे जतन करत पुढे जाण्यासाठी आपले मंडळ अनेक प्रकारे कार्यरत आहे.

या वर्षी NEMM समितीने आपल्या जुन्या उपक्रमां बरोबरच अनेक छोटे-मोठे नवीन उपक्रम चालू करुन, आपल्या न्यू इंग्लंडच्या मराठी संप्रदायाला एकत्रित आणण्याची आणि आपली मराठी संस्कृती पुढे नेण्या ची घोडदौड चालू ठेवली आहे. ह्या कार्यक्रमांचा तुम्ही आस्वाद घ्यावा आणि अशीच मोठ्या संख्येने उपस्थिती लावावी अशी मंडळाची आशा आहे.

यावर्षी, NEMM Yuva आणि NEMM Josh मंडळा च्या नव्या उमेदीचे प्रतीक बनले आहेत, तर NEMM Sports community मधील संघ भावने ला नव्याने झळाळी देत आहे.

NEMM Yuva, आपल्या तरुण पिढीला एकत्र आणत आहे, त्यांना सांस्कृतिक वारसा, नेतृत्वगुण आणि सामाजिक बांधिलकी शिकवत आहे. त्यांचा उत्साह, नवनवीन कल्पना आणि सहभागामुळे आपली परंपरा नव्या दृष्टिकोनातून अनुभवण्याची संधी मिळत आहे.

त्याचप्रमाणे, NEMM Josh ने स्थानिक कलाकारांना प्रशिक्षित करून, मंडळा च्या च नव्हे तर, विविध स्थानिक संस्थाच्याही  कार्यक्रमां मधे भाग घेउन कार्यक्रमांची शोभा वाढवली आहे.

त्यांचे योगदान केवळ केवळ ढोल ताशा कले पर्यंत मर्यादीत नाही, तर त्याने आपल्या समुदायातील एकता वाढवण्यास मदत केली आहे. आपला सांस्कृतिक वारसा अश्या तऱ्हेने पुढे जातो आहे हे आपल्यासाठी खूपच प्रेरणादायी आहे.

आणि संस्कृतिक, सामाजिक कार्यक्रमां बरोबरच आपण NEMM Sports च्या माध्यमातून सामुदायिक खेळ आयोजित करून आपल्या मराठी मित्र मैत्रिणींना सभागृहाबाहेरही कनेक्टेड राहण्याच्या संधी उपलब्ध  करून दिल्या.

NEMM समितीने या वर्षी पहिला वाहिला  दिवाळी पहाट चा कार्यक्रम आयोजित केला आहे. त्याला मिळालेल्या भरभरून प्रतिसादाने आमचा उत्साह अजूनच वाढला आहे.

या दिवाळी अंकाच्या माध्यमातून आपल्याला आपल्या समुदायातील अनेकांचे साहित्य, विचार, आणि प्रतिभा पाहायला मिळणार आहेत. या अंकाच्या निर्मितीमध्ये ज्यांनी आपला वेळ आणि योगदान दिले, त्यांचे मनःपूर्वक आभार.

आपल्या मुलांना आपल्या संस्कृतीशी जोडणे आणि पुढील पिढ्यांना या समृद्ध परंपरांची ओळख करून देणे, हे आपले सर्वांचे कर्तव्य आहे. त्यासाठी मंडळ आणि आपण सर्वच प्रयत्न करत आहोत आणि करत राहुयात.

आपल्या समुदायाच्या एकोप्यामुळेच, आपली मराठी संस्कृती परदेशातही तेवढ्याच जोमाने फुलत आहे. पुढील वर्षातदेखील असेच अनेक उत्तम कार्यक्रम आणि उपक्रम आपल्या मंडळाच्या माध्यमातून आपल्यासमोर आणण्याचा आमच्या कार्यकारिणीचा मनोदय आहे.

आपल्या सगळ्यांचा सहभाग, आपुलकी आणि प्रोत्साहन हेच NEMM ला यशस्वी करत आहे. या दिवाळीला एकत्र येऊन नव्या उत्साहाने, नव्या उमेदीने नवी सुरवात करूया.

पुन्हा एकदा दिवाळीच्या खूप खूप शुभेच्छा!!!

वैशाली गाडे
अध्यक्ष
न्यू इंग्लंड मराठी मंडळ

## न्यू इंग्लंड मराठी मंडळ (NEMM)
## २०२४-२०२५ कार्यकारिणी समिती


- वैशाली गाडे
- माया ताम्हणकर
- सचिन येवला
- पल्लवी दातार
- अंजली माईणकर
- राहुल गाडे
- राहुल वाचासुंदर
- अदिती मांजरेकर
- अक्षता सहस्रबुद्धे-कापडणे
- श्रेया जोशी
- वृषाली फिरके
- मिलिंद रानडे
- निखिल बाविस्कर
- आश्रय भावसार
- अभि कानडे
- साहिल नलावडे
- चैतन्य भावे
- अमृता सामंत भडकमकर
- कौमुदी वाळिंबे
- प्रणय भडकमकर

## संपादक समिती

कौमुदी वाळिंबे, राहुल वाचासुंदर, साहिल नलावडे, माया ताम्हणकर, वैशाली गाडे

# MEET NEMM SPONSORS






# MEET NEMM SPONSORS

Sankalp®
The Taste of India
FOXBOROUGH MA



# MEET NEMM SPONSORS

WESTERN INDIAN SPECIALTY CUISINE

Visit and Order: TheBombayBrunch.com
Email: lexbombaybrunch@gmail.com
Instagram: @Bombay.Brunch
Facebook: @TheBombayBrunch
Phone: 781-207-3245

Personal and Corporate Parties | Retail Orders | Farmers Markets | Music Concerts | Community Gatherings | Packaged Products | Partnerships

BOMBAY BRUNCH

OFFICIAL CHITALE SWEETS PARTNER FOR NEW ENGLAND REGION

Scan the QR code to visit our website!



# बाल कला


## माझा बाप्पा - अन्वित भोजने



**Colorful Sky - मिश्का भालेराव**



# माझा Favorite बाप्पा - अवनी भिडे



# पणतीचा प्रकाश - मिश्का भालेराव



# दिवाळी - नीना नाखरे



# कविता, कोडी

# तुझी तुळस आज ही दाराबाहेर ताटकळते आहे


**अजिंक्य बोकिल**

देव दिवाळीच्या दिवशी कृष्णाचे लग्न अंगणात असलेल्या तुळशीबरोबर लावले जाते. काही महिन्यांपूर्वी कलकत्त्यामध्ये एका डॉक्टर स्त्रीवर अत्याचार झाला, त्या पार्श्वभूमीवर ही कविता काही भाष्य करू पाहते. स्त्रियांचे प्रतिनिधित्व करणारी तुळस जी स्वतः कृष्णाची पत्नी आहे, ती स्वतःच्याच अंगणात आज सुरक्षित नाही. म्हणून आजच्या कलियुगात ही कविता कृष्णाला काही विचारू पाहते आहे.

तुझी तुळस आजही दाराबाहेर ताटकळते आहे
आजची द्रौपदी तुझ्या साडीची वाट पाहते आहे
आज नर नारायणाची जोडी अवतरायची गरज आहे
धर्म-अधर्माची गणितं मांडायची वेळ आली आहे
अर्जुनाचा रथ बेलगाम होण्याआधी सावरायचा आहे
आजच्या कलियुगात प्रसन्न दिवस पाहायचा आहे
आजही कुटुंबाचा डाव लावणारे युधिष्ठिर
आणि दुष्यासनाची हपापलेली नजर मन जाळते आहे....
तुझी तुळस आजही दाराबाहेर ताटकळते आहे....
इथे दुर्योधन सत्तेसाठी, वर्चस्वासाठी लढत आहेत
स्त्रीभ्रूणहत्या करणारे कंस आजही समाजात वावरत आहेत
पुन्हा कुरुक्षेत्र कलियुगात उभे राहते आहे
आपण किती दिवस हे सगळं सहन करायचं आहे
कलियुगात गांधारीची पट्टी निघायची वाट पाहते आहे....
तुझी तुळस आजही दाराबाहेर ताटकळते आहे....

# ‘महाराष्ट्र’ : शब्दकोडे

## गुरुप्रसाद दि पणदूरकर



| **आडवे शब्द :-** | **उभे शब्द :-** |
|---|---|
| १] ‘भावार्थदीपिका’ लिहिणारे, अवघ्या २१ व्या वर्षी समाधी घेणारे थोर संत | २] २०१५ साली ‘ज्ञानपीठ’ जिंकणारे मराठी साहित्यिक - भालचंद्र ‘XXX’ |
| ४] महाराष्ट्रातले एक मुस्लिम सुधारणावादी कार्यकर्ता व लेखक - ‘XXX’ दलवाई | ३] माधवराव पेशवे यांची पत्नी |
| ७] ‘बॉलीवूड’मधील लोकप्रिय मराठी नायिका - ‘XXX’ दीक्षित | ४] प्रसिद्ध कथा-कादंबरीकार - ‘XX’ नारायण आपटे |
| ९] नटरंग, झोंबी अश्या लोकप्रिय साहित्यकृतींचे लेखक - आनंद ‘XXX’ | ५] ‘बलुतं’कार प्रसिद्ध दलित साहित्यिक - ‘XX’ पवार |
| ११] ‘XXX’ पण वाकणार नाही - हा मराठी माणसाचा बाणा मानला जातो | ६] प्रथितयश मराठी संगीतकार, गीतकार - यशवंत ‘XX’ |
| १४] ‘केईएम वॉर्ड नं ५’ सारखी लोकप्रिय पुस्तके लिहिणारे ज्येष्ठ डॉक्टर - ‘XX’ बापट | ८] उत्तर महाराष्ट्रातील एक जिल्हा |

||न्यू इंग्लंड मराठी मंडळ||
सेतू मराठी मनांचा
New England Marathi Mandal

| आडवे शब्द :- | उभे शब्द :- |
| --- | --- |
| १५] प्रकाश आंबेडकर यांचा महाराष्ट्रातील राजकीय पक्ष - 'XXX' बहुजन आघाडी | १०] 'महामहोपाध्याय' पंडित व संशोधक - 'XX' वामन पोतदार |
| १७] पुण्यातील एक प्रसिद्ध किल्ला (कोंढाणा) - 'XX'गड | ११] 'हास्यजत्रा' मधील लोकप्रिय अभिनेते - प्रभाकर, गौरव व दत्तू यांचे आडनाव |
| १९] महाराष्ट्रगीताचे कवी - 'XX' बढे | १२] सुवर्णकार समाजातील संत व कवी - 'XXXX' सोनार |
| २१] बॉलीवूडमध्ये ग्लॅमरस आईच्या भूमिका लोकप्रिय करणारी मराठी अभिनेत्री - 'XX , XX' | १३] 'भारतरत्न' महाराष्ट्रीयन क्रिकेटपटू |
| २५] महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्व - 'X, X,' देशपांडे | १६] अमरावती येथील स्वातंत्र्यसैनिक, केंद्रीय कृषीमंत्री, कृषीतज्ञ - 'XXXXX' देशमुख |
| २७] आहारावरील अनेक लोकप्रिय पुस्तके लिहिणारी, सेलिब्रिटी-प्रिय आहारतज्ञ व लेखिका - 'XXX' दिवेकर | १८] हिंदी चित्रपटांमधील प्रसिद्ध ज्येष्ठ अभिनेत्री - 'XX' चिटणीस |
| २९] कोल्हापूर जिल्ह्यातील एक तालुका - 'XX'कणंगले | २०] लोकप्रिय साहित्यिक, कथाकथनकार - 'X, X,' काळे |
| ३०] रायगड जिल्ह्यातील निसर्गरम्य समुद्रकिनाऱ्याचे स्थळ व तालुका - 'X'वर्धन | २२] जुन्या काळातील प्रसिद्ध नाटककार, कादंबरीकार - 'XX' वरेरकर |
| ३१] सुभाष भेंडे यांचे अमेरिकावारीवरील प्रसिद्ध पुस्तक - "गड्या आपुला 'XX' बरा" | २३] सद्यकाळातील लोकप्रिय कवी, गीतकार - 'XX' ठाकूर |
| ३२] 'श्यामची आई' पुस्तकाचे लेखक व हळव्या मनाचे समाजवादी नेते - 'XX' गुरुजी | २४] महाराष्ट्रीयन गानकोकिळा |
| ३४] शिवरायांचा राजधानीचा किल्ला | २६] दीड लाखांच्यावर बिनाटाक्याच्या नेत्रशस्त्रक्रिया करणारे पद्मश्री डॉक्टर - तात्याराव 'XXX' |
| ३५] काडसिद्धेश्वराचा मठ आणि सिद्धगिरी वस्तुसंग्रहालय असणारे कोल्हापूर जिल्ह्यातील स्थान | २८] थोर कवी 'माधव त्र्यंबक पटवर्धन' यांचे टोपणनाव - माधव 'XXXX' |
| ३६] १९३० साली मुंबईत शहीद झालेले पुणे जिल्ह्यात जन्मलेले मुस्लिम युवक - बाबू 'XX' | ३०] रायगड जिल्ह्यातील निसर्गरम्य समुद्रकिनाऱ्याचे स्थळ व तालुका - 'X'वर्धन |
| | ३१] अंधश्रद्धाविरोधात, स्वच्छतेसाठी काम करणारे अमरावतीचे संत व समाजसेवक - 'XXX' महाराज |
| | ३२] 'मांग' समाजातील एक थोर मराठी साहित्यिक व लोकनेता - अण्णा भाऊ 'XX' |
| | ३३] महाराष्ट्राच्या सांस्कृतिक राजधानीचे शहर |

# एकता

ज्योती जोशी

पेटीवर काळ्या पांढऱ्या पट्ट्या सुरेल वाजतात.
निवडूंगावर एकाच वेळी
अनेक पक्षी घरटी बांधून
किलबिलाट करतात.
पंजाची पाची बोटे भिन्न
असून एकजूटपणे घास
भरवितात.
कादंबरीच्या बगीच्यांत
एकाच खांब्याला कवटाळत
गोकर्ण नी जास्वंदी
बहरतात...
मग आम्हीच कां
भिन्न भिन्न जाती,धर्म,भाषांत
गुरफटतो?
गुण्यागोविंदाने एकत्र नांदू
शकत नाही???

# तळ्यात की मळ्यात?

**ज्योती जोशी**

भारतभेटीला आल्या आल्या नॉईज प्रदुषणानी
माझे कान बहिरे झाले.
पण आता सारं ते अंगवळणी पडलंय.
बाहेर ट्रॅफिकचा गोंगाट तुफान आहे.

मध्येच एखादी ॲंबुलन्स
धाय मोकलून
रस्ता मोकळा करा ...
रस्ता मोकळा करा
विनवण्या करीत
रस्ता कापीत जाते.
त्यांतच साळूंकीचा चिवचिवाट, खारीची कर्कश शिट्टी
सिलींगचा पंखा रात्रंदिन गरगरत
सगळ्या या नादांतून मला
एक वेगळाच ओंकाराचा
ध्वनी ऐकू येत राहतो.
एकम सत् विप्रा बहुधा वदन्ति।

अमेरिका सोडतांना
मी मनाच्या एका वेगळ्याच
भोवऱ्यांत सापडले होते...
दरवाज्यावर थाप पडते
शेजारीण सई सॅली गहिवरलेल्या सुरांत सांगते,
“बॉन व्हायाज जोटी.लवकर परत ये हं सुखरूप.”
जॉनची कळकळ...
“जपून रहा ज्यो, एकटीच जातेयस.”
लिंडा दाराशी थबकते,
“We will miss you ज्योडी,
Our village won’t be same without you.”

गेले कांही दिवस येता जाता
माझ्या कानांत हाच मंत्रघोष घुमत होता,

केव्हा जडली ही भोळी माया?
अनोख्या मैत्रीच्या पाशांत मी गुरफटले?

घर बंद करतानाची तारांबळ
सामानाची बांधा बांध... कपड्यांची धरसोड
हातांना गुंतवते,
कमरेला सोसवेल
एवढी बॅग हलकी करते.
पण मनाचा बोजा वाढतोच आहे...वाढतोच आहे!
हे काय कोडे?

इतरवेळी जगाच्या सफरीवर जातांना
अशी मनाची कधीच घालमेल नसते.
थोड्याच दिवसात माझ्या कुटीत परतणार
हे मनावर पक्कं गोंदवलेले असते.
मग आज मातृभूमीकडे परत वळताना
अस्वस्थतेचा पूर का लोटतो?
अर्धशतक या मानलेल्या आईने ...
ममतेनं आपलंसं केलं.
तरीही मनाच्या सुप्त कोपऱ्यांत...
जन्मदात्रीची कूस...तिची ऊब
खुणावतच राहिली?
पावलं नेतील तिथल्या मातीत मी सहज
रुजते...
पण आज परतल्यावर मायभूमीची
धूळ मला वेगळ्याच
गंधपंचमीत माखते.
गुलमोहर, वड, पिंपळ , पारीजातक
बनतात लगेच माझे सगेसोयरे.
नी अमेरिके तील सदाहरित
पाईनच्या सळ्या
परकेपणाने खुपायला लागतात.
एकाएकी जीवनाची शिवण पार उसवते...
नी मायभुमीची तुटलेली नाळ
जादूने परत सांधत जाते.

आतां अमेरिकेत परतल्यावर...
झोप अनावर झाली तरी
विसकटलेल्या अंथरूणात शिरावसं वाटत नाही.
तसंच हे काहीसं!
जीवनाची घडी पुन्हां चापून चोपून
नीट करण्याचा केविलवाणा प्रयत्न
जिप्सीचा नव्याने सुरू होईल.
नी क्षणार्धांत तिथली मी...
परत मी इथली होईन.
आयुष्य मात्र
तळ्यांत कीं मळ्यांत...
खेळ खेळत राहील
नी मला खेळवत राहील.

# शोध

## ज्योती जोशी

दादर-डी एल वैद्य रोड...
माझे जन्मस्थान
रस्त्यावरून चालते आहे.
पावलांखाली आठवणी  ठेचाळत आहेत.

ट्रॅफीकच्या कचाट्यात कसा बसा
जीव मुठीत घेऊन...
हात उंचावत मी ओरडते,
अरे थांबा थांबा!! मला म्हातारीला
रस्ता क्रॅास करून दे ना!!!

पण कोणालाच दिसत नाहीत
माझे उंचावलेले हात...
कोणालाच ऐकू येत नाही
माझी काकुळतेची विनवणी...

इथेच तर रमलं होत ना माझं बालपण?
जुन्या पुराण्या सुरकुतलेल्या
पुसट खुणाही सापडत नाहीत.

पूर्वीची कौलारू घरं, नारळीच्या बागा...
टोलेजंग इमारतींनी हद्दपार केलं साऱ्याना.
तो चणेवाला भय्या? तो पानवाला अण्णा?
पिठाने माखलेला गिरणीवाला?
कुठे गेले सारे???

तरीही मी शोधत रहाते कोणी ओळखीचे
चेहरे सापडतात का?
पण दिसतात ते फक्त कानाला
फुटलेले मोबाईल नी तंग विजारी.

देवळाशेजारी जुन्या वडाच्या
पारंब्यांची पालवी आरपार
भिंतीचा तट झुगारून वर येते नव्याने
माझ्या आठवणींचं खत चाखत चाखत
मशगूल स्वत:च्याच चिमुकल्या विश्वांत.

पावलं नकळत देवळाची पायरी ओलांडतात
नी काळाशार विठोबा कर कटेवरी ठेवूनी
मात्र अजूनही माझ्यासाठी ताटकळत
उभा राहिलेला मला सापडतो.

# मुलाखत/मनोगत

# The Sounds of Joy

## *Embracing my Heritage through Music*

**नील नाखरे**

Rhythmic drum beats rang out across the parking lot and echoed through the hot, sticky summer air. Sweat trickled down the foreheads of the group of performers as our hands moved in unison, rattling out a story of highs and lows, practice and preparation, teamwork and togetherness. To a listener, an energetic series of notes strung together, drifting over the black asphalt; while to us, they were so much more.

Music knows no limits, nor any boundaries – it does not stop with the sky but continues onwards through the universe. It is the reason that millions of people around the world are connected, not only to one another, but also to their ancestors and heritage. The first week that I walked through the glass doors of our practice site, I nervously descended the carpeted steps, not sure of who my fellow performers were. By the end of the month, I knew them all very well. Likewise, I entered the venue knowing nothing about the Tasha whatsoever, save for the fact that it was loud, required fast hands, and was played along with the Dhol. After four weeks, I could not only play the Tasha, but also understood the beats and rhythms required to perform such a complex instrument. And although the Tasha sticks will not rest in my hands until the next performance, the beats continue to float through the air and linger in my heart.

# NEMM Josh
# Josh 2024 -2025 Cohort
## Mayur Mansukh




- **How much time are you associated with the team?**
  I've been with Josh for a year, but it feels like I've known these folks forever! The onboarding was that smooth.

- **Who coaches you – how do they do that?**
  Neelesh and Sarthak were my coaches. Tejas wasn't officially a coach, but he's taught me some great tricks when it comes to Tasha playing.

- **Tell us about the first time you handled your instrument and how it's going now.**
  Let's just say my first practice was… memorable. I felt like a baby learning to walk. But thanks to the super patient coaches, I'm getting the hang of it. I've played at three events so far (still with a little hand-holding ).

- **Do you think the whole experience is collective or personal for you?**
  Definitely a bit of both. Learning wasn't easy, but I wasn't alone—I had four others struggling right alongside me. Neelesh and Sarthak made sure no one got left behind, which kept us going.

- **Would you like to take this experience outside of the community?**
  I'm not sure about my workplace, but I think the non-Marathi folks in the US would totally enjoy this! Maybe it just needs a little awareness boost to get started.

॥न्यू इंग्लंड मराठी मंडळ॥
सेतू मराठी मनांचा
New England Marathi Mandal

# NEMM Josh
# Josh 2024 -2025 Cohort
## Shivdeep Yelikar




- **How much time are you associated with the team?**
  मी २०२४ सालापासून एनईएमएम जोश पथकाशी जोडला गेलो आहे.

- **Who coaches you - how do they do that?**
  मी ५ वर्षे पुण्यात खेळलो तेव्हापासून मला ढोल ताशा तसा माहीत होता. पण सचिनदादा, सिडदादा आणि अंकुशदादा यांच्या मार्गदर्शनाखाली ढोल ताशा शिबीरात मला खरंच मजा आली.. मला अजूनही आठवते की या ३ प्रशिक्षकांनी वाद्ये, वाद्य कसे वाजवले जाते, ढोल कसे बांधायचे, ढोलाचे विविध 'हात' या सगळ्याचं सर्वांना व्यवस्थित प्रशिक्षण दिलं. त्यांनी शिबिर आनंददायी आणि आकर्षक बनवले.

- **Tell us about the first time you handled your instrument and how it's going now.**
  ढोल ताशा परिचयाचा असल्यामुळे मला ‘जोश’ पथकाचे हात पटकन शिकता आले, उदा. महाकाल, इंद्र जिमी, शिव मुद्रा इ.  पूर्वीच्या अनुभवामुळे मला वाद्य हाताळणे सोपे गेले..

- **Do you think the whole experience is collective or personal for you?**
  हा सगळा अनुभव खूपच आकर्षक होता. शिवाय प्रशिक्षकांच्या शिकवण्यात कोणत्याही संबंधित गोष्टींबद्दल खुलेपणा होता.

- **Would you like to take this experience outside of the community - do you think people at your school / workplace would want to be part of this.**
  निश्चितपणे मला कामाच्या ठिकाणी वाद्याची चर्चा करण्याची संधी मिळाली. भारतीय समुदायाने माझ्या कामाच्या ठिकाणी संधी दिल्यास, मला जोश पथकासह वाजवायला आवडेल.

# NEMM Josh
# Josh 2024 -2025 Cohort
## Nishikant Purohit

- **How much time are you associated with the team?**
  मी आता दोन वर्ष ढोल ताशा पथका  बरोबर निगडित आहे. मागील वर्षी मी गणपतीच्या
  कार्यक्रमा पुरताच ह्यात सहभागी झालो होतो. ह्या वर्षी मी जोश बरोबर गणपती,
  दुर्गा पूजा अशा विविध कार्यक्रमात सहभागी झालो आहे.
- **Who coaches you - how do they do that?**
  मला टोल वाजवायला सचिन, निलेश आणि अंकुश ह्यानी मार्गदर्शन केले.
  तसेच ताशा  वाजवायला निलेश व सार्थक ह्यानी प्रशिक्षण दिले.

- **Tell us about the first time you handled your instrument and how's it going now**
  ढोल, ताशा, टोल अथवा झांज  वाजवताना  एक अनोखा आनंद मिळतो,
  जो ती वाद्ये वाजवल्यानंतरच अनुभवता येतो.
  'जोश'च्या वाद्यवृंदाबरोबर काम करण्यामधे एक आगळाच आनंद आहे.

- **Do you think the whole experience is collective or personal for you**
  माझ्यासाठी हा एक सांघिक अनुभव तर आहेच, परंतु ह्याहून अधिक म्हणजे जे नवीन लोक
  मला ह्या माध्यमातून भेटले, तो अनुभव वैयक्तिक पातळीवर अतुलनीय आहे . ह्यासाठी मी मराठीमंडळ आणि 'जोश'चे नेतृत्व करणारे सचिन येवला आणि अंकुश आठले ह्यांचा  ऋणी आहे.

- **Would you like to take this experience outside of the community - do you think people at your school / workplace would want to be part of this.**
  माझ्या मते  लोकांना एकत्र आणण्याचा हा एक उत्तम उपक्रम आहे. बऱ्याच लोकांनी ह्यातसहभागी होण्याची इच्छा माझ्याकडे व्यक्त केली आहे.
  भारतीय  पार्श्वभूमी  असलेल्या  मुलामुलींना  आपल्या  संस्कृतीच्या जवळ आणण्याचा हा एक चांगला मार्ग आहे.

# NEMM Josh

## Josh 2024 -2025 Cohort

## Mihir Patwardhan



- **How much time are you associated with the team?**
  I try to be associated with the team as much time as possible from helping with playing patterns, practices and wherever possible with the instrument management.

- **Who coaches you - how do they do that?**
  We all work together to listen to the patterns and work with our team members like Neelesh, Ankush and Sachin to practice and learn dhol tasha patterns. Chetan also helped us with the initial coaching for Dhol Tasha in NEMM Josh when we started practicing for the BMM Dhol Tasha competition in 2022.

- **Tell us about the first time you handled your instrument and how's it going now**
  First time I handled Dhol was around 2015 when I played in the Dhol Tasha Pathak in Utah. There is so much to learn still with these instruments and the music that even now when I tie the Dhol, it feels like I am new to this instrument.

- **Do you think the whole experience is collective or personal for you**
  The whole experience of playing in the Pathak and performing is a collective experience. Everyone enjoys the music and performance when there is a 100% participation from all players and spectators who give us motivation and encouragement to play more enthusiastically and play more patterns for the performances.

# चाकोरीबाहेर

राहुल जोशी

आज आपण बातचीत करणार आहोत अशा दोन व्यक्तींशी ज्यांनी आपल्या नेहेमीच्या चाकोरीबाहेर जाऊन, एखाद्या विशिष्ट गोष्टीचा ध्यास घेऊन त्यात ठोस असे काही काम केले आहे. त्यातले पहिले म्हणजे 'मायबोली'चे संस्थापक श्री. अजय गल्लेवाले आणि 'षड्ज'चे संस्थापक श्री. राजेश गोडबोले. ह्या दोघांनीही मोकळेपणाने त्यांचा प्रवास आपल्यासमोर उलगडला आहे.

श्री. अजय गल्लेवाले ह्यांची ओळख नव्याने करून द्यायची निदान न्यू इंग्लंड क्षेत्रातल्या लोकांना तरी गरज नाही. प्रख्यात शिक्षणसंस्थांमधून शिक्षण घेऊन मग अनेक वर्षे तंत्रज्ञान क्षेत्रात मानाची पदे भूषवितानाच 'मायबोली' ह्या प्रसिद्ध संस्थळाचे स्थापक आणि मागील अनेक वर्षे मराठी मंडळात कार्यरत असलेले कार्यकर्ते, कलाकार म्हणूनही ते अनेकांना परिचित आहेत. पण आज आपण त्याच्या एका नवीन पैलू विषयी जाणून घेणार आहोत. चला तर...



मायबोली.कॉम हे मराठीतले प्रख्यात संस्थळ सुरु करण्याचा मान तुमच्याकडे जातो. अशा प्रकारचे संस्थळ सुरु करण्याची कल्पना कशी सुचली? त्याचा प्रवास कसा सुरु झाला

त्याची सुरुवात खरे तर एक प्रॅक्टिकल जोक म्हणून झाली. माझ्या पत्नीला इथे अमेरिकेत घर घ्यायची इच्छा होती आणि तेव्हा मी तिला म्हंटले "इथे घर (home) घ्यायच्या आधी तुमचे होमपेज असावे लागते, आणि म्हणून मजा म्हणून मी ते होमपेज बनवले. अर्थात ह्यातला मजेचा भाग सोडून दिला तरी मला मराठीत लिहायची आवड होतीच आधीपासून. पुणे इंजिनीरिंग कॉलेजात 'अभियंता' आणि मग आयआयटीत 'तंत्र' ह्या दोन्ही नियतकालिकात नियमितपणे लिहिण्याची आणि संपादक होण्याची संधी मला मिळाली होती. मराठीत तेव्हा तसं रेडिमेड मला काही सापडलं नाही म्हणून मग स्वतःच सुरु करायचे ठरवले.

आधी मराठीतून शुभेच्छापत्रे तयार करून पाठवण्याची सोया दिली, मग इतर युझर ग्रुप्स प्रमाणे बुलेटिन बोर्ड सुरु केला आणि लोक येतच गेले. युनिकोड मराठी तेव्हा नुकतं वापरलं जाऊ लागला होता त्याचाही फायदा झाला. सध्या ८८हजार सदस्य आणि ४७ लाख लोकांपर्यंत पोहोच असा मायबोलीचा व्याप वाढला आहे. पुढे अजून काही कल्पना डोक्यात आहेत की ड्रुपलच्या नवीन व्हर्जन ला अपग्रेड करायचे आहे, नवीन लोकं जोडून घ्यायची आहेत. हा प्रवास सुरूच राहाणार आहे.

**माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात काम, मायबोलीचे व्यवस्थापन आणि नियमित देखभाल, मध्ये मध्ये कार्टून्स काढणे, नाच शिकणे असे सगळे छंद जोपासताना सध्या तू एका अगदी वेगळ्याच क्षेत्राकडे वळला आहेस - ते म्हणजे इथे अमेरिकेत, इंग्रजीतून ‘उभ्या उभ्या विनोद’ अर्थात स्टॅन्ड अप कॉमेडी. ह्या क्षेत्रात गेली ४-५ वर्षे चांगला जम बसवत आहेस, तर ह्या अतिशय वेगळ्या आणि अवघड प्रवासाची सुरुवात कशी झाली?**

मी स्वतःला नेहेमी चाकोरीच्या बाहेर ढकलायचा प्रयत्न केलेला आहे आणि कार्टून्स काढताना, वेगवेगळ्या प्रकारचे नाच शिकताना, तबला वाजवताना मला असा नेहेमी जाणवत असायचं की आपण आपल्या मेंदूचा वेगळा भाग आता वापरत आहोत आणि त्यातून मला मजा येत होती, ऊर्जा मिळत होती. पण त्याचबरोबर मला त्या कलांच्या पलिकडे असं काहीतरी करायच होतं की जे मला अजून नवीन काहीतरी शिकायची संधी देईल आणि त्याचबरोबर त्यातून मजा घेताना जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोचता येईल. एक दोन आयुष्यातल्या मजेशीर प्रसंगावरून मला असा जाणवल कि आपण विनोदी ‘स्टोरी टेलिन्ग’ करू शकतोय आणि लोकांना ते आवडलंय. अर्थात त्या वेळेला त्या गोष्टीची सॅम्पल साईझ अगदी कमी होती पण मग त्याच्यातच पुढे प्रयत्न करायचं ठरवलं.

खरंतर, उभ्या उभ्या विनोद किंवा विनोदी कथा कथन हा अतिशय अवघड प्रकार आहे कारण प्रत्येक वेळी तुमच्या समोरचा प्रेक्षक वेगळा असतो त्यामुळे एकाच प्रकारचा विनोद सगळीकडे चालत नाही, मग पहिल्यापासून सुरुवात करावी लागते आणि काय चालत, काय चालत नाही हे बघताना, त्यात सुधारणा करताना मला खूप मजा येत गेली.

सुरुवातीला मलाही अवघड गेलाच हे सगळं, काही ठिकाणी ऑडिशन्स चांगल्या झाल्या नाहीत, पण त्यावेळी मी प्रयत्न सोडले नाहीत, आणि तेव्हाच, २०१९ मध्ये मला नॅशनल टीव्हीवर विनोदी अंगाचे कथाकथन सादर करायची संधी मिळाली. त्यात तुम्हाला एखादा खरा प्रसंग, तुमच्या आयुष्यात घडलेला, विनोदी ढंगाने सादर करायचा असतो आणि तेव्हा मी औरंगाबाद मधल्या बेसबॉलच्या खेळावर एक प्रसंग सादर केला तो त्यांना खूप आवडला आणि मी नॅशनल टीव्हीवर निवडला गेलो. मग हळू हळू काही ठिकाणी पहिली दुसरी, तिसरी बक्षिसे मिळत गेली आणि मला जाणवलं कि हे आपल्याला जमतंय आणि मुख्य म्हणजे करायला खूप आवडतंय. आणि शिवाय हा प्रकार असा आहे की सादर करण्याची जेवढी जास्त संधी तुम्हाला मिळेल तेवढी तुमच्यात सुधारणा होत जाते.

**हे अजून थोडं  विस्तारित रूपात सांगू शकशील का? म्हणजे तुझी साधारण पद्धत कशी असते, विनोदी लेखनासाठी स्फूर्ती कुठून मिळते, किती आणि कशा प्रकारे काम करावे लागते?**

आमच्या व्यवसायात अशी म्हण आहे की जेवढे जास्त लेखन तुम्ही कराल तेवढे चांगले काम तुमच्या हातून होऊ शकते, म्हणजे जितके जास्त विनोद तुम्हाला तयार करता येतील - अगदी स्पष्ट मराठीत सांगायचं झालं तर जेवढे जास्त विनोद पाडता येतील - तेवढे उत्तम. कारण साधारण फक्त ५% विनोद लोकांना पसंत पडतात आणि त्यांची सारखी चाचणी करून ते ठेवायचे का गाळायचे ते ठरवावे लागते. शिवाय प्रत्येक

ठिकाणचा प्रेक्षक वेगळा असतो, एक गटाला एका दिवशी एक विनोद आवडला म्हणजे तो सगळीकडेच चालेल असे अजिबात नाही म्हणून जितके जास्त वेळा तुम्ही लोकांसमोर जाल, जितका फीडबॅक तुम्हाला मिळू शकेल तितकी तितकी तुम्हाला तुमची कला सुधारायला मदत होते. शिवाय सातत्याने लिखाण करत राहावं लागत, मग हळू हळू त्याची तुमच्या मेंदूला सवय होऊन जाते. चालना मिळते, विनोद सुचत जातात, ते चालतील की नाही ह्याची कल्पना येत जाते. शिवाय हे क्षेत्र एवढ मोठं आहे की इथे प्रत्येकाला संधी आहे, प्रत्येक जण वेगळा आहे, प्रत्येकाचे आयुष्य, अनुभव वेगळे आहेत. तुम्ही तुमच्या आयुष्यातले अनुभव वापरत असाल तर तुमचा विनोद वेगळा आणि दर्जेदार होण्याची शक्य वाढते. मी इतर विनोदवीरांपेक्षा वेगळे विषय हाताळतो आणि मुख्य म्हणजे मी अश्लील विनोद शक्यतो टाळतो, ज्याला क्लीन कॉमेडी म्हणतात. प्रत्येक वेळी मला काहीतरी नवीन शिकायला मिळते, नवीन ऊर्जा मिळते आणि मला मी परत तरुण झाल्यासारखे वाटायला लागले आहे.
ह्यात मला एक अध्यात्मिक बैठकही जाणवते, म्हणजे असं की ह्यात प्रत्येक वेळी वेगळा प्रतिसाद मिळत असल्यामुळे तुमचा इगो कमी कमी होत जात असतो आणि त्याच प्रमाणे तुमची तटस्थता वाढत असते. कितीही चांगलं काम केलं तरी प्रतिसाद कसा मिळेल काहीच सांगता येत नाही. कित्येक प्रस्थापित विनोदवीरांनाही मी पडलेलं  बघितलं आहे आणि कित्येक नव्या चेहेऱ्याना चमकताना बघितलं  आहे. प्रत्येक वेळी स्वतःच्या अहम्ला  पूर्ण विसरून नव्याने सुरुवात करावी लागणे ह्या गोष्टीत मला भारतीय अध्यात्मिक तत्वज्ञानाचा संबंध जाणवतो.

**शेवटचा प्रश्न, ह्या क्षेत्रात आता पुढच्या योजना काय आहेत? काय डोक्यात आहे?**
इतर अनेक क्षेत्रांप्रमाणे ह्या क्षेत्रातही गोऱ्या अमेरिकन पुरुषाचे वर्चस्व आहे, आणि एक विशिष्ट उतरंड आहे ज्यात भारतीय पुरुष विनोदवीरांचा क्रमांक जवळ जवळ नवव्या दहाव्या पायरीवर येतो आणि जेवढा क्रमांक खाली तेव्हढी तुम्हाला संधी कमी मिळते आणि इथले यश हे सर्वस्वी तुम्हाला मिळणाऱ्या सादरीकरणाच्या संधीनिवार, त्या फीडबॅक वर अवलंबून असते. तर विचार असा आहे कि अशा उपेक्षित गटाला म्हणजे दक्षिण आशियाई गटाला स्वतंत्र असे व्यावसपीठ उपलब्ध करून देणे.
दुसरे म्हणजे उभ्या उभ्या विनोदाचा प्रसार करणे, मी स्वतः लेक्सिन्गटन गावात ‘उभ्या उभ्या विनोदासाठी’ ओपन माईक  (मुक्त व्यासपीठ) चालू केले आहे ज्यात कोणीही येऊन आपली कला सादर करू शकतो, असे प्रयत्न सगळीकडे व्हावेत अशी माझी इच्छा आहे आणि त्यासाठी मदत करायलाही मी तयार आहे.
आणखी एक गोष्ट म्हणजे मी स्वतःवर कायम वेगवेगळे प्रयोग करत आलोय, म्हणजे आहाराचे, व्यायामाचे, व्यवसायाचे आणि त्यातले काही फसले तर काहींचा अतिशय चांगला अनुभव आला. तर मला असे प्रयोग करून पाहिलेल्या, करू पाहणाऱ्या लोकांचा एक गट तयार करायचा आहे ज्यात सर्व जण मोकळेपणी आपण केलेले प्रयोग, त्यात आपल्याला मिळालेले यश/अपयश ह्यावर चर्चा करू शकतील, इतरांबरोबर ते वाटू शकतील. कारण माझी खात्री आहे, जसे मला आत्तापर्यंत माझ्या प्रवासात अनेक लोक भेटले.  काहींच्याकडून मला काहीतरी नवीन समजले, शिकायला मिळाले, तसेच माझ्या अनुभवाचा फायदा इतरांना देता आला तसे प्रयत्न अजून व्हावेत ही इच्छा आहे.

**श्री. राजेश गोडबोले** हे बॉस्टन भागातील परिचित व्यक्तिमत्त्व. प्रख्यात शिक्षण संस्थांमधून शिक्षण आणि यानंतर तंत्रज्ञान क्षेत्रात महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळत असतानासुद्धा राजेशनी कधीच स्वतःमधला 'सांगीतिक कानसेन' हरवू दिला नाही. त्याच आवडीची परिणीती म्हणून त्यांनी "षड्ज" ही संस्था स्थापन केली. "षड्ज" ही संस्था न्यू इंग्लंड भागातली शास्त्रीय संगीताला वाहून घेतलेली संस्था आहे. भारतीय शास्त्रीय संगीत पद्धतीच्या स्थानिक तसेच भारतातील कलाकारांचे कार्यक्रम इथल्या रसिकांसाठी आयोजित करणे आणि त्याद्वारे इथे भारतीय शास्त्रीय संगीताच्या आस्वादाला आणि अभ्यासाला उत्तेजन देणे ही ह्या संस्थेची दोन प्रमुख उद्दिष्टे आहेत. त्यांच्याशी केलेली ही छोटीशी बातचीत:



**राजेश, तुम्ही गेली अनेक वर्षे वेगवेगळ्या संस्थांच्या माध्यमातून इथल्या रसिकांसाठी भारतीय शास्त्रीय संगीताच्या बैठकी, कार्यक्रम आयोजित करत आहात, अशा काही संस्था चांगले बाळसे धरत असताना तुम्हाला 'षड्ज' ची स्थापना का करावीशी वाटली? काय प्रेरणा, काय कारणे सांगू शकाल?**

२००० सालापासून मी विस्तारीत बॉस्टन भागात सातत्याने भारतीय शास्त्रीय संगीताचे कार्यक्रम आयोजित करण्यात पुढाकार घेतलेला आहे. अनेक वेगवेगळ्या जाबदाऱ्या पार पाडताना मला काही गोष्टी प्रकर्षाने जाणवल्या. शास्त्रीय संगीताचा आस्वाद ही गोष्ट सादरकर्ता आणि रसिक प्रेक्षक ह्या दोघांवर अवलंबून असते. माझ्यामते 'बैठक' ह्या प्रकारात शास्त्रीय संगीत जास्त चांगले अनुभवता येऊ शकतं. शास्त्रीय संगीताची बैठक यशस्वी होण्यात कलाकाराचा मूड, प्रेक्षकांची मनस्थिती, बैठक व्यवस्था, ध्वनी व्यवस्था अशा अनेक गोष्टींचा समावेश असतो आणि मला अस जाणवल की ह्यातल्या बऱ्याच गोष्टीत जर सुधारणा करता आल्या तर आमंत्रित कलाकाराला कला सादर करायला जास्त मजा येते आणि आलेल्या रसिकाला कलेचा आस्वाद जास्त चांगल्या प्रकारे घेता येऊ शकतो. कलेचे व्यवहारी स्वरूप टाळून काही गोष्टींचे पथ्य पाळत उत्तम कार्यक्रम घडवून आणायचे तर बऱ्याच गोष्टीवर नीट नियंत्रण ठेवावे लागते आणि स्वतःची संस्था असेल तर ह्यातल्या बऱ्याच गोष्टी सोप्या आणि शक्य होऊ शकतात. शिवाय बऱ्याच कलाकारांचे दौरे आयोजित करणे, व्हिसा वगैरेची व्यवस्था करणे एखाद्या स्वायत्त संस्थेसाठीच शक्य होते.

दुसरे महत्त्वाचे कारण असे कि बऱ्याचदा प्रस्थापित कलाकारांनाच इथे अमेरिकेत बोलावले जाते कारण त्यांच्या नावावर हमखास तिकीट विक्री होते, पण नवीन, ताज्या दमाच्या कलाकारांनाही संधीची गरज असते आणि इथल्या रसिकांनाही नवीन कलेचा आस्वाद घेण्याची इच्छा असते. स्वतःच्या संस्थेमार्फत हा नव्या जुन्याचा संगम नीट घडवून आणता येऊ शकतो हाही एक उद्देश संस्थेच्या स्थापनेमागे होता. सर्व कलाकारांना आणि रसिकांना एक उत्तम अनुभव देता यावा आणि त्याची एक परंपरा निर्माण व्हावी ह्या कारणासाठी षड्ज हि संस्था मी २०१५ साली माझ्या काही सहकाऱ्यांबरोबर स्थापन केली.

**कुठलीही संस्था स्थापन केल्यावर तिचे अर्थकारण सांभाळणे हा एक अत्यंत महत्त्वाचा भाग असतो तर तुम्ही ही बाजू कशी संभाळलीत?**

कुठलेही काम सुरु करायला, पुढे न्यायला पैसे लागतातच आणि ती बाजू जर नीट सांभाळली गेली नाही तर संस्थेचे आयुष्य किंवा वाटचाल धोक्यात येऊ शकतो तेव्हा हा विचार डोक्यात सुरुवातीपासूनच होता. मी सुरुवातीला माझ्या खिशातून व्यवस्था केली होती पण त्याच्या मर्यादा लक्षात घेऊन संस्था स्वयंपूर्ण व्हावी असे प्रयत्नही चालूच ठेवले होते.

सुरवातीपासूनच कार्यक्रमाचा दर्जावर उत्तम राखण्याकडे लक्ष दिले. कार्यक्रम वेळेत सुरु करणे, उत्तम ध्वनी व्यवस्था आणि इतर नेटके आयोजन त्याचबरोबर कलाकारांची व्यवस्था उत्तम ठेवून त्यांचा मूड उत्तम राहील ह्याची काळजी घेऊन रसिकांना एक अत्युत्तम श्रवणानुभव दिला. एकदा तुमचा प्रेक्षकवर्ग तयार झाला, त्यांना कार्यक्रमाच्या दर्जाची खात्री पटली की ती बाजू आपोआप सांभाळली जाते. त्यानंतर मग षड्जची सदस्य नोंदणी सुरु केली, तिकीट विक्री वाढवणे, मर्यादित प्रमाणात प्रायोजक आणि इतर संस्थांबरोबर जोड-आयोजन अशा विविध गोष्टी केल्या. सुरुवातीला काही हितचिंतकांनी मदतीचा हात पुढे केला होता आणि शिवाय ज्या कलाकारांशी माझी जवळीक होती त्यांनीही मदत केली, पाठिंबा दिला आणि ही म्मत वाढवली. आता सांगायला आनंद वाटतो की  संस्था आपल्या पायावर नीटपणे उभी आहे आणि पुढची झेप घ्यायला तयार आहे. शिवाय संस्थेचे काम बघून इथल्या स्थानिक शिष्यवृत्ती, ग्रँट्स वगैरेही मिळू लागल्या आहेत. त्यात पैसे फारसे नसले तरी आपण योग्य मार्गावर आहोत ह्याची पावती मिळते आहे.

**षड्ज संस्थेच्या वाटचालीबद्दलचे काही ठळक पैलू सांगू शकाल का?**

थोडक्यात सांगतो, साडेनऊ वर्षांपूर्वी जेव्हा संस्था सुरु झाली तेव्हा वर्षाला साधारण ६ कार्यक्रम करायचे असे डोक्यात होते, पण वाढता प्रतिसाद, रसिकांचा आणि कलाकारांचाही बघून ती संख्या वाढतच राहीली. आजपावेतो, वेगवेगळ्या बैठका, प्रात्यक्षिके, कलाकारांशी संवाद आणि अर्थातच मैफिली असे सगळे मिळून साधारण २०० च्या वर कार्यक्रम संस्थेने केलेले आहेत. ह्यातच कोविड काळात संस्थेने (बहुधा) जगात पहिल्यांदा थेट प्रक्षेपण करून (लाईव्ह), प्रत्यक्ष बैठकीचा अनुभव देणारे पण पूर्णपणे ऑनलाईन असे कार्यक्रमही दिले जे वैशिष्ट्यपूर्ण ठरले. अनेक कलाकार षड्ज च्या मंचावर पहिल्यांदा अमेरिकेत आले तर काहींनी त्यांच्या नव्या दौऱ्याची सुरुवात षड्ज च्या मंचावरून केली. आता २०२४ हे वर्ष संपायला आलय पण ह्या एका वर्षात संस्थेमार्फत जवळ जवळ १४ कार्यक्रम सादर झाले. हे सगळं शक्य झालं ते फक्त आणि फक्त रसिकांच्या पाठिंब्यामुळे आणि माझ्या सहकाऱ्यांच्या कष्टामुळे.

**शेवटचा प्रश्न - संस्थेसाठी पुढे काय योजना डोक्यात आहेत?**

सध्या तरी सर्व लक्ष दहाव्या वर्षानिमित्त होऊ घातलेल्या पूर्ण दिवसाच्या महा कार्यक्रमाकडे आहे. एक संपूर्ण दिवस, भारतातल्या अनेक प्रथितयश आणि नव्या दमाच्या कलाकारांची कला षड्ज च्या मंचावर सादर होणार आहे. ५ एप्रिल २०२५ कडे लक्ष ठेवा, आमची वेबसाईट आहे shadaj.org त्यावर माहिती येत राहीलच.
त्यांनंतरही अनेक नवीन कलाकारांची ओळख इथल्या रसिकांना करून द्यायची आहे, फेसबुक किंवा युट्युब माध्यमातून जगभरच्या रसिकांना आस्वाद घेता येईल अशाप्रकारे कार्यक्रम सादर करायचे आहेत, आणि त्याचबरोबर नव्या दमाच्या नव्या कार्यकर्त्यांची दुसरी फळी भक्कम करायची आहे. काही प्रख्यात संस्था एकत्र काम करण्यासाठी उत्सुक आहेत त्यांच्याबरोबर भारतीय शास्त्रीय संगीताचा प्रसार करायचा आहे आणि त्याचप्रमाणे lexington च्या शाळेमध्ये भारतीय शास्त्रीय संगीत १०१ अशा प्रकारे वर्ग सुरु होणार आहेत त्याकडे लक्ष द्यायचे आहे.

# लेख

# दिवाळी - माझा आवडता सण

## नेहा खैरनार - भामरे

भारतीय सणांमध्ये 'दिवाळी' हा सण सर्वात लोकप्रिय सण मानला जातो. आंतरराष्ट्रीय पातळीवर दिवाळी सणाला सांस्कृतिकदृष्ट्या महत्वाचे स्थान मिळाले आहे. आपण कितीही मोठे झालो तरी प्रत्येकाला आपल्या लहानपणची दिवाळी नक्कीच आठवत असणार. शाळेत असताना प्रत्येकाने एकदा तरी ‘दिवाळी - माझा आवडता सण’ असा निबंध लिहिला असणार. त्या काळात दिवाळी इतकी प्रिय असायची की काही वेळा 'माझा आवडता प्राणी' अशा विषयावर निबंध लिहीतानासुध्दा - आवडता प्राणी वानर, कारण रामाच्या बरोबर वानरसेना होती, रामाने रावणाचा कसा वध केला आणि आपण दिवाळी कशी साजरी करतो असेच लिहीले जायचे. 'माझा आवडता प्राणी' निबंधाचे विषयांतर कसे झाले हे लक्षातही यायचे नाही.

दिवाळीचे आध्यात्मिक महत्वही असले तरी लहान असताना दिवाळी म्हणजे शाळेला सुट्टी, नवीन कपडे, फटाके, फराळ, पाहुणे, बाजार, साफसफाई, मित्र - मैत्रिणीची वर्दळ असे चित्र असायचे. दिवाळीचा फराळ हा एक महत्वाचा भाग असायचा. फराळ करण्यासाठी आई, आजी , शेजारच्या काकूंना मदतीला घेऊन स्वयंपाक घरात कष्ट करत असायच्या. कित्येक वेळा “स्वयंपाक घरात लुडबुड करू नको” म्हंणून ओरडा तर ठरलेला असायचा. तयार केलेला फराळ किमान सहा महिने पुरेल याची तरतूद असायची, म्हणजे शाळेत खाऊ म्हणून डब्यात देता येईल. चिवडा, लाडू, शेव, चकल्या, करंज्या, सांजोऱ्या, शंकरपाळे अश्या सर्व पदार्थांनी डबे भरलेले असायचे. दिवाळी म्हणजे 'साफसफाई' हा सुध्दा एक महत्वाचा कार्यक्रम असायचा. घरातले सर्व कानेकोपरे, उंचावरचा माळा यांची साफसफाई व्हायची. "तू मांजरीला घरात घेतले आणि तिने माळ्यावर तीन पिल्ले दिली", आई न चुकता याची आठवण द्यायची.

दिवाळीची रात्र म्हणजे 'अमावस्या'. दिवे लावून प्रकाश व्हावा असे त्यामागचे उद्दिष्ट. लहान असताना कुणाच्या घरी सर्वात जास्त पणत्या, आकाशकंदील, सुंदर रांगोळी याची जणू अप्रत्यक्ष स्पर्धा चालायची. संस्कृतभारतीच्या रांगोळ्या, ठिपक्यांची रांगोळी यामुळे रस्ते रंगलेले दिसायचे. काही रस्त्यावर नेते मंडळींचा फोटो, शुभेच्छा आणि आकाशकंदील भर चौकात लटकलेला असायचा. आकाशकंदील किती मोठा, कसा असावा यावर भरपूर कष्ट घ्यावेत आणि शेवटी त्यात बल्ब लागला नाही म्हणून तिसराच कुठलातरी कंदील फायनल झाल्याचे समाधान असायचे.

नरकचतुर्दशी म्हणजे छोटी दिवाळी. विष्णू देव आणि काली मातेने नरकासुराचा वध केला, त्यानंतर विष्णू देवाने तेलाने स्नान करून आपला देह स्वच्छ केला अशी गोष्ट सांगितली जाते. 'अभ्यंग स्नान ', उटण्याने देह आणि मन प्रसन्न करावे असा त्यामागचा हेतू. लहान असताना आई आणि आजी भांडी घासवीत तसं आम्हाला चोळून काढायच्या. भाऊ त्या भीतीने पाट सोडून घरभर सैरावैरा पळायचा. एका स्नानात वर्षभराची धूळ आणि माझ्यातला नरक निघून जाईल असे त्यामागचे तर्कशास्त्र.

धनत्रयोदशीला घरातील सोने, दागदागिने, पैसे यांची पूजा असायची. धन्वंतरी देव समुद्र मंथनातून एका हातात अमृत आणि दुसऱ्या हातात आयुर्वेद घेऊन आले अशा गोष्टी आजी सांगे. दिवाळीच्या शेवटच्या दिवशी दिवाळी पहाट आणि सनई वादन यांनी दिवसाची सुरवात व्हायची. नवीन कपडे घालून एकमेकांच्या घरी लक्ष्मीपूजन करणे आणि संपेपर्यंत फटाके फोडणे असा कार्यक्रम चालायचा.

‘लहानपणची दिवाळी वेगळीच होती’ असे सर्वांच्या मनात कधीतरी येत असेल. त्या आठवणींनी आजची दिवाळी बदलली आहे याची जाणीव प्रत्येकाला होत असेल. खरतर आजही दिवाळी तशीच आहे मात्र आपण लहान नसून मोठे झालो आहोत, वेळ - पद्धती बदलल्या आहेत हे नक्की. दिवाळी आजही आपल्या आयुष्यातल्या क्षणांना सोनेरी प्रकाशमय करून जाते. काळानुसार बदल आपण थांबवू शकत नाही मात्र त्या सोनेरी क्षणाचे संगोपन आपण करूच शकतो. आपले अनुभव, भावना, सण समृद्धीच्या गोष्टी नव्या पिढीला सांगू शकतो कारण हेच क्षण त्यांच्यासाठी एका नव्या, आध्यात्मिक आणि पारंपरिक दृष्टिकोनाची दिव्यज्योत असेल आणि ती अखंड तेवती ठेवणे ही आपली जबाबदारी!

# आपलं बुवा असंच आहे!

## राजेश बेरी

२०२४ पॅरिस ऑलिंपिक संपले आणि तुम्हा आम्हा सारख्या न्यू इंग्लंडस्थित इंडो-अमेरिकन क्रीडा चाहत्यांसाठी हा एक दीर्घ आणि थकवणारा काळ संपला. शेवटी एक असा शांत कालावधी सुरू झाला आहे, जिथे आपण खेळांचा आनंद घेऊ शकतो, त्याच्या निकालाची काळजी न करता.

हा सर्व गदारोळ एप्रिल मध्ये सुरू झाला. एकाच वेळी आइस-हॉकी आणि बास्केटबॉल प्लेऑफ्स सुरू झाले. बोस्टन ब्रुइन्स आणि बोस्टन सेल्टिक्स अजिंक्य पदासाठी स्पर्धा करतील अशी अपेक्षा होती. दुर्दैवाने, ब्रुइन्स दुसऱ्या फेरीतच पराभूत झाले, त्यांच्या चाहत्यांच्या अपेक्षांनुसार कामगिरी झाली नाही. सुदैवाने, दीर्घ काळानंतर सेल्टिक्सने न्यू इंग्लंडच्या चाहत्यांना अजिंक्य पद मिळून दिले व सन २०१९ मध्ये पेट्रियट्सनी सुपर बॉल जिंकल्या नंतरचा ५ वर्षांचा दुष्काळ संपवला.

सर्व सेल्टिक्स चाहत्यांच्या उलट, मी मात्र अजिंक्य पदाचे ७ सामने होतील अशी आशा बाळगून होतो, कारण पाचवा सामना होईपर्यंत मी भारतात होतो. माझे परत येण्याचे नियोजन (काही महिने आधीच) ७ व्या सामन्याच्या दिवशी ठरले होते. इंटरनेट आणि सोशल मिडीयाच्या कृपेने, मी माझ्या मुलांशी, भावाशी आणि मित्रांशी खेळाच्या वेळी संपर्कात राहू शकलो आणि विजयाची मजा दुरूनच अनुभवू शकलो. मी दुप्पट आनंदी होतो कारण आमची लाडकी सरिना, धाकटा भाऊ निलेश आणि त्याची मुले, हयांनी त्यांचा पहिल्या विजयी मिरवणुकीचा आनंद लुटला. कदाचित पुढच्या वर्षी मला संधी मिळेल अशी आशा ठेवून बॉस्टनला परतलो.

सेल्टिक्सच्या यशस्वी कामगिरी पाठोपाठ फक्त १२ दिवसांनी, भारतीय क्रिकेट संघाने टी-२० विश्व चषक स्पर्धेत आपल्या सर्व प्रतिस्पर्ध्यांना हरवून आणि दक्षिण अफ्रिकेला अंतिम सामन्यात पराभूत करून चषक पटकावला. एवढ्या अल्प काळात, दोन विश्व चषकांच्या आनंदात मी मात्र आता पुढे काय अश्या विचारात पडलो. इजा झाला, बिजा झाला, आता तिजा कोण? तेवढ्यात ट्यूब पेटली, पॅरिस ऑलिम्पिक्स! सगळ्या गोष्टी तिय्यात होतात, म्हणूनच ऑलिम्पिक्स मध्ये भारतीय क्रीडापटू भरगच्च पदके कमवणार अशी आशा धरून ठेवली. अनपेक्षितपणे, भारतीय खेळाडूंनी कमी पदके मिळवली आणि एकही सुवर्ण पदक कमावले नाही. तरीसुद्धा काही क्षण होते जे आपल्यासाठी आनंदमयी ठरले. भारतीय पुरुष हॉकी संघाने पुन्हा कांस्यपदक जिंकले, मनू भाकरने दोन पदके जिंकून इतिहास रचला आणि नीरज चोप्राने टोक्यो सुवर्ण पदकाच्या जोडीला रौप्य पदक जिंकले. ऑलिम्पिक्सच्या शेवटच्या दिवशी मी एक मोठा निश्वास सोडला आणि पुढील काही महीने मनाला त्रास देणाऱ्या स्पर्धा नसल्यामुळे, मानसिक शांती, भरपूर झोप आणि फॉलची मजा घेण्याची संधी अश्या आशेत गुरफटलो.

न्यू इंग्लंडमधील फॉल हा खरोखरच एक जादुई ऋतू आहे. दीर्घ, गरम, दमट उन्हाळ्याचा शेवट आणि  आल्हाददायक, हळदीहून पिवळे, कोवळे ऊन! रात्रीची गुलाबी थंडी, बेसबाल प्लेऑफ्स आणि फुटबॉल हंगामाची सुरुवात. २१व्या शतकाच्या पहिल्या दोन दशकांमध्ये, टॉम ब्रॅडीची फुटबॉल मैदानावरील जादू व बॉस्टनला १० अजिंक्य पदे मिळवून देणारी बिग पापीची बेसबॉल डायमंडवरील धडाकेदार हाणामारी आम्ही भरपूर अनुभवली. आलेख आणि सरिना (आमची दोन बाळं) मोठे  होत असताना फेनवे पार्क किंवा जिल्लेट स्टेडियममध्ये सामने पाहायला नेण्याचा आनंद अविस्मरणीय होता. मुलं आता कॉलेज संपवून घराबाहेर पडली आणि दुर्दैवाने, रेड सॉक्स व पेट्रियट्सचचे विजयी खेळाडूही निघून गेले, उरल्या त्या फक्त गोड आठवणी.

२०२० चे दशक न्यू इंग्लंडमधील बेसबॉल आणि फुटबॉल चाहत्यांची परीक्षा घेणारे आहे. रेड सॉक्स आणि पेट्रियट्स अजिंक्यपद मिळवणं सोडाच, साध्या दुसऱ्या फेरीत पोचणं पण अशक्य झाले आहे. तरीही मी ठीक आहे, कारण जिंकण्याचे दडपण दूर झाल्यामुळे, मी निर्भेळ आनंदात सगळे सामने बघू शकतो. शिवाय मला आणि तुम्हाला खात्री आहे की भविष्यात दोन्ही संघ पुन्हा अजिंक्यपद मिळवतील.

माझ्या शांततेचा भंग झाला एका मागून एक चांगल्या खबरीने. भारतीय पुरुष संघाने आशियाई हॉकी अजिंक्यपद जिंकले, क्रिकेट संघाने बांगलादेशला २८० धावांनी पराभूत केले, जागतिक बुद्धीबळ ऑलिम्पियाड मध्ये भारताने उत्कृष्ट कामगिरी केली, पुरुष आणि महिला संघांनी अजिंक्यपद जिंकले आणि चार वैयक्तिक सुवर्ण पदके कमवली. मग माझ्या मनाला पुन्हा हुरूप आला, आणि मी आगामी कसोट्यांची उत्सुकतेने वाट बघू लागलो. नेमके न्यूझीलंड विरूद्धच्या पहिल्या कसोटी मध्ये फक्त ४६ धावा..  सर्व क्लेश आणि तणाव परत सुरू! पण काय करणार - हेच खरे जीवन. आपलं बुवा असंच आहे!

# विंडो सीट

## चिंतामणी प्रभाकर मुळे (डोंबिवली)

गोष्ट १९८२ च्या दरम्यानची.  मुंबई-बंगलोर असा आमचा पहिलाच  विमान प्रवास होता.  त्या काळी ऑनलाईन सीट रिझर्व्हेशन नव्हते. विमानतळावर  पोहचल्यावर काउंटरला बोर्डिंग पास देत असत. लवकर पोहोचलात तरच हवी ती सीट मिळत असे.

पहिलाच अनुभव असल्याने आम्ही वेळेआधी दोन एक तास पोहचून हिच्याकरिता विंडो आणि माझ्या करिता मधील सीट घेतली होती. दोन तीन प्रकारच्या सुरक्षा तपासण्या होईस्तोवर खूप वेळ गेला आणि शेवटी उशीर झालाच. विमानात प्रवेश केला तर ते आधीच बऱ्यापैकी भरलेले होते.

विमानात आसन  क्रमांक खुर्चीच्या मागच्या बाजूस न लिहिता, वरील सामान कक्षाच्या खालच्या बाजूस लिहिलेले असतात, त्यामुळे विंडो सीट समजणे थोडे कठीण जाते. आम्ही खांद्याच्या बॅगा सावरत कसेबसे सीट जवळ पोहोचलो तर ऐशीच्या आसपासचे एक आजोबा आधीच विंडो सीटवर बसले होते. मी जेव्हा त्यांना ती जागा आमची आहे असे सांगितले तेव्हा ते म्हणले

“अरे बेटा, मुझे लगा, ये मेरा सीट है, अगर आपको ऐतराज न हो तो मैं यही विंडो मे बैठू क्या? पहली बार जा रहा हू, क्या मालुम, शायद ये आखरी बार भी हो सकता है!”

ही मला म्हणाली, “बसू दे, बसू दे, वयाने जास्त दिसत आहेत आणि एकटेच प्रवास करत असावेत, मी मधल्या सीट वर बसते, मला काय इथून पण बाहेरचं  दिसेलच की”. आम्ही त्यांच्या बाजूला बसलो आणि थोड्याच वेळात सुरक्षा सूचना होऊन विमान उडाले. नंतर पूर्ण प्रवासात तो माणूस आमच्याशी एक अक्षरही बोलला नाही. मी त्याला एकदा विचारले “आप, अकेले जा रहे हो क्या?”  त्याने कानाशी हात ठेवत, ऐकायला येत नाही असे दाखवले.

“अगदी साधा माणूस दिसतोय नाही, बहुतेक एकटाच मुलाकडे वगैरे जात असावा, आयुष्यात एकदा तरी विमान प्रवास करावा अशी इच्छा असेल आणि तो देखील खिडकीत बसून,  म्हणून पण आला असेल,” ही म्हणाली.

थोड्यावेळाने खानपान सेवा सुरु झाली. त्या आजोबांचे हात थरथरत होते म्हणून आम्हीच त्या आजोबांना ट्रे टेबल उघडून दिले, त्यांचा जेवणाचा ट्रे ठेवला, त्यांचे खाऊन झाल्यावर ट्रे उचलून ट्रे टेबल बंद करून दिले. तरीही ते आमच्याशी एक अक्षर बोलले नाहीत.

तासाभराच्या उड्डाणानंतर विमान बंगलोरच्या विमानतळावर उतरले. “आपके साथ कोई हैं क्या?” उतरतांना आम्ही त्यांना विचारले तर पुन्हा ते कानावर हात ठेऊन ऐकू न आल्यासारखे करत होते. शेवटी आम्ही प्रयत्न सोडून दिला.

आम्ही सामानाच्या बेल्ट जवळ आलो, बॅगा येण्यास बराच वेळ गेला. ते आजोबा कुठे दिसतात का ते आम्ही बघत होतो. हिने हळूच खूण केली, ते नेमके आमच्या मागेच उभे होते.

बघतो तर काय त्यांच्या बरोबर अजून दोन तीन जण होते, एक आजी होती, बहुधा त्यांची पत्नी असावी आणि मुलगा, सून असावेत.

“'पपा, आप को आखीर विंडो सीट मिली क्या?” मुलगा त्यांना विचारत होता.

“अरे,पंचासो ट्रिप किये मैने, आज तक कभी विंडो छोडके बैठा हू? वही अपनी ट्रिक चलाई, ‘पहली बार जा रहा हू - शायद आखरी बार भी हो सकता है’ फिर मिल गई सीट” हे ऐकल्यावर ते चौघेही एकमेकांना टाळी देत खो खो हसत सुटले.

मी आणि ही मात्र एकमेकांकडे बघत राहिलो. त्या घटनेमुळे हा पहिला विमानप्रवास आमच्या कायम स्मरणात राहिला.

# गृहीत
## भास्कर पवार

दुपारचे दोन वाजले असावेत. मोबाईल ची रिंग वाजली, पलिकडून आवाज आला, “काय चाललय आराम का? बऱ्याच दिवसांत फोन नाही गाठभेट नाही विसरलात का,” 'एकाच दमात अनेक प्रश्न विचारले गेले. आवाज ओळखीचा वाटला नाही. पण प्रतिप्रश्न करुन आपण कोण बोलताय हे विचारायला संकोच वाटू लागला. "नाही ना ओळखलं, नाहीच ओळखणार तुम्ही आम्हाला," पलिकडून पुन्हा वन-वे बोलणं सुरु! “अहो मी पद्माकर बोलतो, आतातरी ओळखलं का? आपण बंडीच्या लग्नाच्या वेळी भेटलो होतो. जेवायला शेजारी शेजारी बसलो होतो.. आठवले कां?” मला तर काहीच आठवत नव्हते कोण पद्माकर, कोण बंडी? पण अगदीच विसराळू ठरू नये म्हणून मी घाईने ‘हो हो ओळखले ओळखले’ सांगीतले व ‘सुटलो बुवा’ म्हणून निश्वास टाकला पण तो अल्पावधीत असफल ठरला."सांगा बर मला काय म्हणत लहानपणी," पलिकडुन दणका. काय सांगावे बरं... काही तरी उत्तर देणे भाग होते. “अरे बंड्या ना तुम्ही,” मी पण ठोकितो ऐसाजी कि अशी धिटाई केली, समोरच्यांची प्रतिक्रिया काय येते याची प्रतीक्षा करावी लागलीच नाही. खो-खो चा स्फोट झाला. "वा वा, काय तुमची स्मरणशक्ती! माझं टोपणनावही लक्षांत आहे की तुमच्या. तर मी काय सांगत होतो,dy आमचे सासरे सदाशिव जोशी हे उद्या पुण्यात येत आहे. त्यांना थोडी मदत हवी आहे. आपण त्यांना नक्की मदत कराल अशी आशा आहे. त्यांचे काय काम आहे ते आपल्याला समक्षच सांगतील. असो, मी फोन ठेवतो." अन फोन बंद झाला! आता मी खरोखरच निश्वास टाकला. पण फोन कोणाचा होता शेवट पर्यंत कळले नाहीच. दुसऱ्या दिवशीपर्यंत हा फोनचा विषय मी संपूर्णपणे विसरून गेलो.

दुपारी चार वाजतां घराबाहेर रिक्षा थांबल्याचा आवाज आला. कोणा गृहस्थाचे व रिक्षा चालकाचे जोरात बोलणे ऐकू आले. रिक्षाचालकाकडे पैसे सुटे नसल्याचे व त्या गृहस्थाकडे पाचशेची नोट असल्याचे त्यांच्या बोलण्यावरून लक्षात आले. थोड्या वेळांत दरवाजाची बेल वाजली. दारांत पंचावन्न ते साठ वयाचे एक उंच, झुपकेदार मिशा असलेले शर्ट व धोतर असा पेहराव केलेले ग्रहस्थ उभे होते. "नमस्कार, मी सदाशिव जोशी, मनमाडचे पद्माकर कुलकर्णी यांचा सासरा. आपणांस काल त्यांनी फोन केला होता."  “हो केला होता फोन,” मी तुटक तुटक उत्तर दिले. “असं करा पांचशेचे सुटे द्या.” "सुटे नाही माझ्या जवळ," मी झटकायचा प्रयत्न केला. “बरं मग १७८रुपये द्या त्या रिक्षाचालकाला, मी सुटे करुन देतो तुमचे.” आता पळवाटा बंद झालेल्या दिसल्या. पाकिटातून १८० रुपये काढून दिले. तोपर्यंत सदाशिवराव सोफ्यावर स्थिरावले. सौभाग्यवतीने पाणी आणून दिले ते तांब्या तोंडाला लावून घटघटा पिऊन, मिशांवरील पाणी हाताने पुसत, "मला थोडा गोड चहा पण भरपूर लागतो" किचनकडे पहात सदाशिवराव पहाडी स्वरात वदते झाले.

मी आपला बापडा खुर्चीवर बसून हे सारे बघत होतो. सौ.ने तत्परतेने तीन कप चहा आणला. एक कप माझ्या हातात देऊन दोन कप सदाशिव रावांच्या पुढ्यात टीपॉयवर ठेवले. एका मागोमाग एक करीत दोन्ही कप चहा चविने फुरक्या मारत संपवून सदाशिवराव उठले. बॅगेतून पंचा व स्नानाचे कपडे घेत, "राजे बाथरूम कुठे आहे? मी स्नान केल्याशिवाय काहीच करत नाही, प्रथम स्नान!" असे म्हणू लागले तेव्हा मी भानावर आलो. मलाच राजे संबोधित होते ते. मी झटकन उठून ‘या ना’ म्हणत  त्यांना आंत नेऊन बाथरूम दाखवून गरम गार पाण्याचे नळ दाखवून, थोडे मार्गदर्शन करुन बाहेर आलो.

मधल्या घरांत आई, पत्नी, दोन्ही मुलं दबा धरून माझी वाटच पाहत होते. "कोण हो हे पाहुणे?" बायकोचा पहिला प्रश्न. उत्तरासाठी तोंड उघडले पण काय सांगणार नक्की कोण! "अग माझ्या मित्राचे सासरे." ‘कोण मित्र?” दुसरा प्रश्न जुळ्या भावासारखा पुढे आला. "अग तो बंड्या," कालच्या फोनचा संदर्भ आठवत मी बोलून गेलो. "बाबा त्या आजोबांच्या मिशा फारच लफ्फेदार आहेत ना" मंदार बोलला. चिरंजीवांच्या निरीक्षणशक्तीचा प्रत्यय आलाच. "सदाशिव पेशवेच दिसतांत जसे," कन्या रत्नाची मुक्ताफळे. आईने मात्र "अतिथीदेवो भव. बरं भास्करा, असु दे असु दे” म्हटल्यावर मला जरा धीर आला. मी थोडा स्थिर झालो, कालच्या फोनचा विचार करू लागलो. थोडे थोडे स्मरण होऊ लागले.

दोन वर्षे झाली असतील एका लग्नाच्या समारंभात जेवणाच्या पंगतीत एक पन्नाशीचे गृहस्थ शेजारी बसले होते. सहज म्हणून बोलणे झाले. जेवत असताना येणाऱ्या प्रत्येक वाढप्याला, 'अरे साहेबांना वाढ, जिलेबी वाढ’ असा आग्रह चालला होता त्यांचा. मला पंगतीत खूप संकोच वाटतो पण शेजारच्या त्या गृहस्थाने आग्रह करकरून मला पोटभर खायला लावले. मीही त्यांना आग्रह केला. पानाचा विडा घेताना थोडी जुजबी माहितीची देवाणघेवाण झाली. मी त्यांना विचारले ‘मला जेवताना का आग्रह करत होता हो,’ त्यावर त्यांनी सांगितले "अहो पंगतीत मागायला लाज वाटते म्हणून शेजारच्याला आग्रह करायचा मग तोही आपल्याला आग्रह करतो." त्याचे हे आग्रहशास्त्र सडेतोड असले तरी माझ्या पचनी पडले नव्हते. त्यानंतर फोननंबरची देवाणघेवाण झाली. माझा पत्ता त्यांनी काळजीपूर्वक टिपून घेतला होता. एकंदरीत आता थोडं तरी कोडं उलगडलं होतं. पण या जुजबी ओळखीमधून स्वतःच्या सासऱ्यांना थेट घरी पाठविणे जरा जास्तच होतंय असं मला वाटून गेलं.

सदाशिवरावांची आंघोळ आटोपली. "मला जेवायला अगदी साधं विना तिखट लागते. भाजी कोणतीही चालते," स्पष्ट पणे मेनु ऐकवला गेला. पुन्हा एकदा चहा झाला. मुलांना समोर बोलावून काय शिकता, व्यायाम करता का, कुठले खेळ खेळता, शुभंकरोती म्हणून दाखवा इ. इ. आजोबापण दाखवून झाले. जेवण चवीने जेवले. रात्री मुक्कामाला घराचा हॉलच पसंत असल्याचे  त्यांनी सांगितले व हॉलमध्येच सोफ्यावर झोपले.

दुसऱ्या दिवशी सकाळी लवकर उठून सदाशिव राव खड्या आवाजात अभंग म्हणत होते त्या आवाजाने मला जाग आली. सर्व ऐहिके उरकली, चहा नाष्टा आटोपला. "जरा माझ्या बरोबर येता का?" अशी विनंती सदाशिवरावांनी केली. सुटी होती, मला नाही म्हणताच आले नाही. मी व सदाशिवराव रिक्षा करुन निघालो. एका मोठ्या हॉस्पिटलसमोर जाऊन रिक्षा थांबली. "तुम्ही थांबा, मी येतो आतून" सदाशिवराव म्हणाले व छोटी जडशी कातडी बॅग घेऊन घाईने आत गेले. मी वेटिंगरुममध्ये आरामात बसून राहिलो. 'कोण बरे आजारी असावे यांचे' असा विचार करीत किती वेळ गेला कळलेच नाही. दीड-दोन तासानंतर सदाशिवराव आले. त्यांच्या बरोबर दहाबारा पुरुष, स्त्रिया, मुलं घोळक्याने आली. पुरुषमंडळींनी अत्यंत आदराने मला हात जोडून नमस्कार केले. सदाशिवरावांनी माझा परिचय करुन दिला. माझा पत्ताही दिला. सारा घोळका रिक्षापर्यंत आम्हाला सोडायला आला. आम्ही दोघे घरी आलो. "चला आता अतिथी जायेंगे," असे सदाशिवराव मोठ्याने हसत हसत म्हणाले. हक्काने सौ.कडे चहा मागितला. सदाशिवरावांनी आईला अगदी वाकून नमस्कार केला. चहा घेऊन आमचा निरोप घेऊन ते रिक्षाने निघून गेले.

दोन चार दिवसात आम्ही सारे सदाशिवरावांना विसरलो. नेहमीचे आयुष्य सुरु झाले. साधारण दहा बारा दिवसांनी दुपारी एक पार्सल आले. कुणाकडून आले हे पाहून ताब्यात घेतले. 'सदाशिवराव जोशी मनमाड' यांचेकडून ते आले होते. पार्सल उघडले. आत दोन भरजरी साड्या, दोन शर्ट-पॅन्ट पिस, एक ड्रेस चे कापड, एक चिठ्ठी व एक चेक! चिठ्ठीत लिहिले होते, "चि. भास्करा, अनोळखी माणसांसाठी तुमचे कुटुंब इतके झटले. एका शब्दानेही दुखविले नाही की चेहऱ्यावरील स्मित ढळू दिले नाही. रिक्षाचे भाडेही परत मागितले नाही. मी आणि जावयाने आपणांस गृहीत धरले. आपण मात्र 'अतिथीदेवो भवधर्म' मनोभावे पाळला. अतिथी म्हणून मी फूल ना फुलाची पाकळी पाठवीत आहे. मोकळ्या मनाने स्वीकारावे - सदाशिव." चेकची रक्कम बघून माझे डोळेच विस्फारले - अठरा हजार रुपये! प्रत्यय आला, एक दाणा पेरला की हजार दाणे उगवतात.

इतक्यात एक अनोळखी इसम दारांत आले, "येऊ का आत?" चेहरा ओळखीचा वाटला पण नक्की कोण ते आठवेना. 'या, या' म्हणून त्यांना आंत घेतले. "आपली ओळख सदाशिवकाकांनी करुन दिली होती हॉस्पिटलमध्ये," संदर्भ लागला. ते सद्गृहस्थ पुढे म्हणाले, "आम्ही निघतो आहोत मनमाडला. माझे वडील आजारी होते त्या दिवशी तेथे हॉस्पिटला. हृदय शस्त्रक्रिया होती. हॉस्पिटलचे बिल, एकवीस लाख भरायचे होते. त्या दिवशी सदाशिव काकांनी आणले होते, ते त्यांनी भरले. शस्त्रक्रिया यशस्वी झाली. एका फोनवर काका स्वतः रोकड घेऊन आले. हॉटेलवर रहाणे सुरक्षित नव्हते, पद्माकरने आपले नांव सुचविले. म्हणून ते आपल्याकडे रहायला आले होते. फार फार आभारी आहे मी आपला." सगळं ऐकून मी थक्क! पण एका देव माणसाने आपल्याला 'गृहीत' धरले याचा आनंद मात्र आयुष्यभर रहाणार आहे.

# निष्कांचन

## वीणा पेंडसे

१५ जुलै १९९०. आमची आजी गेली तो दिवस अगदी व्यवस्थित आठवतोय. रविवार होता. १५ दिवस ती पाण्याचे आणि कॉफीचे थोडे घोट यांवरच होती. खूप क्षीण झाली होती. झोपूनच होती आणि बोलतही नव्हती काही. सकाळचीच वेळ होती. बाबा मंडईत गेले होते. अचानक तिने डोळे उघडले. डोळ्यातले तेज पार निघून गेले होते. श्वासाला थोडा त्रास होत होता. ‘गंगा गंगा’ असं काहीतरी म्हणाली. कोणाच्या तरी लक्षात आलं की ती गंगा मागत होती. तिच्या देवांच्या देव्हाऱ्यातून गंगा आणली. ‘सदू’ असंही म्हंटल्या सारखं वाटलं. गंगा उघडेपर्यंत बाबा आले नाहीत तर... असा विचार करत असतानाच बाबा आले. बाबांनी तिला गंगा दिली आणि तिने प्राण सोडले. फारसा काही त्रास न होता ती गेली. अगदी शांतपणे. आयुष्यभर सर्व प्रकारचा त्याग करून सुकून गेलेले ते शरीर आणि तो चेहेरा, पण चेहेऱ्यावर काही यातना दिसत नव्हत्या. दिसत होती ती फक्त शांती !!! तिला हवा होता तसा निष्कांचन मृत्यू तिला आला होता.

बँक अकाउंट, दागिने, साड्या हे काही नव्हतंच तिच्याकडे. तिचा एक पितळ्याचा डबा देव्हाऱ्याशेजारी ठेवलेला असायचा. त्यातही देवाला दक्षिणा ठेवण्यासाठी १, २, ५, १० पैशांची नाणी एव्हढच. तिचे देव हेच तिचं पझेशन. गोष्टी सांगण्याची कला फारच छान अवगत होती. किंजवडेकर शास्त्रींचं पुराण ऐकून रोज रात्री आम्हाला गोष्टी सांगायची. शाळेत न जाऊन सुद्धा पावकी, निमकी तोंडपाठ. सगळी भगवद्गीता, इतर अनेक स्तोत्रे अगदी तोंडपाठ. आम्ही वाचलेले इंग्रजी धडे, टी.व्ही.वरच्या बातम्या आणि क्रिकेटची कॉमेंट्री ऐकून तिला थोडं थोडं इंग्रजी कळतं हे लक्षात आलं तेव्हा आम्हाला केवढा आश्चर्याचा धक्का बसला होता!

ती वयाच्या पस्तीसाव्या वर्षापासून फक्त एकदा जेवायची. रात्रीच्या जेवणाला भाकरी असेल तर स्वतःला जेवायचं नसूनही आम्हाला सगळ्यांना गरम गरम भाकरी करून वाढायची. कधी रागावली नाही की ओरडून बोलली नाही. तिचं सोवळं ओवळं खूप होतं पण त्याचा जाचक त्रास तिने आम्हाला दिला नाही. आमच्या आईच्या आईला आमच्याकडे राहायला संकोच वाटायचा. आजी तिला “तुमची मुलगी नोकरी करते, तुम्हाला राहायला काहीच हरकत नाही” असं सांगायची. विहिणी विहिणी अगदी आनंदाने एकत्र राहायच्या. तिच्यावर तिच्या आजूबाजूच्या कर्मठ समाजाने केवढा अन्याय केला होता. केशवपन करून घेऊन तिने तो सहनही केला होता, तरी त्या समाजाच्या बुरसट विचारांचा तिच्या वागण्यावर परिणाम झालेला नव्हता हेच तिने तिच्या वागण्यातून दाखवून दिलं. भगवद्गीता नुसती तोंडपाठ केलेली नसून ती आचारण्यातही ती पूर्णपणे यशस्वी झाली होती.

घरी जाते तेव्हा देवांच्या देव्हाऱ्यात मी तिला बघते. देवीच्या देवळात तिची पुराणाला बसायची जागा ठरलेली होती, तिथे मी तिला बघते. तिची एकही वस्तू तिने या जगात ठेवलेली नसूनही, आठवणींच्या स्वरूपात ती आमच्या हृदयात आहे. माणसांमध्ये राहूनही संसारात कसं गुंतू नये, अलिप्त कसं राहावं हे स्वतःच्या वागण्यातून दाखवून दिलं तिनी. कुठल्याही गोष्टीचा मोह, हव्यास करायचा नाही हे अति लहान वयात नियतीने तिला करायला भाग पाडलं. पण नंतर मुलांची आर्थिक परिस्थिती उत्तम असतानाही तिनी तसं करून दाखवलं. वयाच्या पस्तीसाव्या वर्षांपासून ती कधी गादीवर झोपली नाही अथवा तिने गरम पाण्याने आंघोळ केली नाही. दुसऱ्या कोणाच्या तर सोडाच, पण स्वतःच्या नातवंडांच्या लग्नालाही गेली नाही. केवढा अतीव त्याग आणि केवढी अलिप्तता!!! तिने दाखवून दिलेल्या मार्गावर चालणं किती महत्वाचं आणि जरुरीचं आहे हे आता  जाणवतंय. तिच्यातले थोडे तरी गुण आचरता आले पाहिजेत असं प्रकर्षानी जाणवतंय.  तसं करायची मनःशक्ती आम्हाला प्राप्त होवो हीच परमेश्वर चरणी प्रार्थना.

या लौकिक जगातून जाताना ती ‘निष्कांचन’ गेली आणि आम्हाला मात्र संस्काररूपी सोन्याने मढवून गेली. तिच्या स्मृतीला शतशः प्रणाम!

# कल दे सॅक

## चिंतामणी प्रभाकर मुळे (डोंबिवली).

बोस्टनला मुलाकडे गेलो की वेगवेगळे रस्ते शोधायचा आणि भरपूर पायपीट करायचा माझा छंद. माझा मुलगा राहतो बोस्टन जवळच्या अँडोवर मध्ये.

त्या दिवशी तेथील भागात एक मॅरेथॉन स्पर्धा होती. घराघरातून लोक, स्पर्धा बघण्यासाठी किंवा भाग घेण्यासाठी निघाले होते. रस्त्यावर कधी नव्हे ती, माणसांची प्रचंड गर्दी होती. एक तर ऑगस्ट महिना, भयंकर गर्मी. घामाघूम झालो होतो.

बऱ्याच घरांच्या फ्रंट यार्ड मध्ये लहान मुलांनी लेमोनेड स्टॅन्ड लावले होते. टेबलावर काकड्या, भोपळे, लिंबू सरबत विकायला ठेवले होते. काही जणांनी ब्लॅक बोर्डवर “कुकुम्बर, स्क्वॅश आणि लेमोनेड कप” अशी चित्र काढून दर लिहिले होते. येणाऱ्या जाणाऱ्यांना बोलावून मुले लेमोनेड पिण्याकरिता आग्रह करीत होती. मला मोठी मजा वाटली.

ती मजा बघत पुढे पुढे जात असताना रस्ता गोलाकार होत गेला आणि एके ठिकाणी संपला. अमेरिकेत अशा गोलाकार रस्त्याला कल दे सॅक म्हणतात. त्याचा डिक्शनरी अर्थ मी बघितला होता. एक लहान रस्ता जो एका टोकाला बंद आहे किंवा अशी परिस्थिती जी कोठेही नेत नाही.

पुढे जाण्यात काही अर्थ नाही म्हणून मी परत फिरणार इतक्यात तेथील एका लेमोनेड स्टॅण्डवर उभा असलेला एक पाच सहा वर्षाचा मुलगा मला हात हलवून बोलावतांना दिसला.

“बाय वन लेमोनेड प्लिज, ओन्ली फिफ्टी सेन्ट्स?” तो काकुळतीला येऊन सांगत होता. त्याचा स्टॉल रस्त्याच्या अगदी शेवटी असल्याने तेथे कोणी येत नव्हते म्हणून तो नाराज असावा.

“नोबोडी कमिंग टू माय शॉप” तो रडत रडत म्हणाला. मला दया आली.

मग मी एक लेमोनेड घेत त्याला विचारले

“होऊ मेनी हॅव यू सोल्ड सीन्स मॉर्निंग?” त्या वर पैशाचा रिकामा प्लास्टिक बॉक्स दाखवत, डोळे पुसत तो म्हणाला

“नॉट अ सिंगल, नोबॉडी कमिन्ग हिअर”.

“यू हॅव नो फ्रेंड्स, यू आर अलोन?” मी असेच विचारले.

“आय हॅव नो मनी फॉर कँडी, सो माय फ्रेंड लेफ्ट अँड जॉईन्ड आदर फ्रेंड्स” तो म्हणाला.

तो सांगत होता ते खरे होते. त्याच्या सगळ्या काकड्या, भोपळे आणि सरबताने भरलेला जार तसाच होता. मी अजून चार लेमोनेड प्यायलो आणि त्याच्या सगळ्या काकड्या आणि सगळे भोपळे विकत घेतले. मी हे सर्व नेऊ कसे? म्हणून विचारताच, तो धावत घराकडे गेला आणि मोठी पेपर बॅग  घेऊन आला. आपल्या मुलाकडून एव्हढे सामान एकदम घेणारा कोण, हे कौतुकाने बघायला एक म्हाताऱ्याश्या आजी देखील बाहेर आल्या.

मग त्या आजीने मला कुठून आलो ते विचारले.  मी सागामोरे  रस्त्यावरील घर क्रमांक  सांगताच ती म्हणाली,अरे तुमच्या परसात तर  काकड्या आणि भोपळ्याचे भरपूर वेल आहेत, बऱ्याचदा तेथे फ्री मध्ये फळे घेऊन जा म्हणून बोर्ड लावलेला असतो. तेच ना तुमचे घर?, मग तुम्ही आज विकत का घेताय?

मी तिला म्हटले, " तुमचा नातू खूप नाराज होता, कल दे सॅक वर घर असल्याने एकही जण इकडे फिरकत नव्हता, तो रडत होता, माझ्या एका छोट्याश्या कृतीने, मी त्याला खूप मोठा आनंद देऊ शकलो, त्याच्या चेहऱ्यावरील समाधान आणि हास्य मला खूप काही देऊन गेले ते मी ते शब्दात सांगू शकत नाही."

तो मुलगा दहा डॉलर्स ची नोट उंचावत, "मनी फॉर माय कँडी" असे आनंदाने ओरडत होता,कविता म्हणत नाचत होता. उद्या शाळेत तो, मित्रांना त्याच्या सगळ्या वस्तूंची कशी विक्री झाली आणि त्याने एकरकमी पैसे  कसे कमावले ते आनंदाने सांगणार होता, सगळे मित्र मिळून कँडी खाणार होते.

काकड्या आणि भोपळ्यांची ती पिशवी घेऊन मी घराजवळ आलो आणि कोणाच्याही नकळत हळूच, आमच्या फ्रंट यार्ड मध्ये  'फ्री घेऊन जा' म्हणून मांडून ठेवलेल्या फळभाज्यांमध्ये ती पिशवी रिकामी केली.

# ‘महाराष्ट्र’ - शब्दकोडे : उत्तरांसहित

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ ज्ञा | २ ने | श्व | ३ र | | ४ ह | मी | ५ द | | ६ दे |
| | मा | | ७ मा | ८ धु | री | | ९ या | १० द | व |
| ११ मो | डे | १२ न | | ळे | | १३ स | | त्तो | |
| रे | | १४ र | वी | | १५ वं | चि | त | | १६ पं |
| | १७ सिं | ह | | १८ ली | | न | | १९ रा | जा |
| २० व | | २१ री | २२ मा | ला | २३ गु | | २४ ल | | ब |
| २५ पु | २६ ल | | मा | | २७ रु | २८ जू | ता | | रा |
| | २९ हा | त | | ३० श्री | | लि | | ३१ गा | व |
| ३२ सा | ने | | ३३ पु | | ३४ रा | य | ग | ड | |
| ठे | | ३५ क | णे | री | | न | | ३६ गे | नू |